# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

# कुंभारी,

ता.जत जि.सांगली.

# राजे रामराव महाविद्यालय,जत,

ता.जत, जि.सांगली.

दिनांक १५ एप्रिल २०२४

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐ 51AA 638548

मुद्रांक किंमत रुपये १००/- ए.मु.किंमत १००/-
जत विक्री नंबर ८२९८ तारीख 6 NOV 2023
मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव प्र.प्राचार्य
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कुंभारी ता.जत, जि.सांगली.
रा. तालुका, जत जि. सांगली
कारण सामंजस्य करार
परवानाधारक मुद्रांक विक्रेत्याचे नाव व सही } श्री. ए.बी. पडोळकर मुद्रांक विक्रेता जत तहसिल आवार परवाना क्रमांक २४०३००५

27 OCT 2023 Sub Treasury Officer, Jath

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुंभारी,

आणि

राजे रामराव महाविद्यालय, जत

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचेराजे रामराव महाविद्यालय, जत हेजिल्ह्यातील एक प्रतिथयश महाविद्यालय आहे. शिवाजी विद्यापीठाशी संलग्न या महाविद्यालयामध्ये" ज्ञानविज्ञान आणिसुसंस्कार यासाठी शिक्षण " हे ब्रीद घेवून विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास करणे, विद्यार्थ्याची संशोधक दृष्टी विकसित करणे अशी ध्येये डोळ्यासमोर ठेवून ज्ञान प्रसार करणे, वत्या संदर्भात विविध उपक्रम या महाविद्यालयाच्या वतीने राबविले जातात.त्यानुसार विविध चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळांचे आयोजन केले जाते.विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्याचबरोबर या महविद्यालयाची ग्रंथसंपदाही मोठी आहे.

दि फ्रेंड्स आसोसिएशन जत संचलित, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुंभारी हेसांगली जिल्ह्यातील, जत तालुक्यातील डोंगरी व कायम दुष्काळी भागात आहे. हे महाविद्यालय शिवाजीविद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांमधूनज्ञानदानाचे कार्य सुरु आहे. या महाविद्यालयाच्या माध्यमातून साहित्यिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकासासाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहे.

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुंभारी व राजे रामराव महाविद्यालय हीमहाविद्यालये व संस्था एकमेकांबरोबरदिनांक ८ जानेवारी २०२४ रोजी सामंजस्य करार करत आहेत. संदर करारादवारे उभय संस्थाच्या सहयोगाने करावयाची खालील उद्दिष्ट्ये निर्धारित करण्यात आली.

**उद्दिष्ट्ये:**

६) विविध संदर्भातील विविध चर्चासत्रे, कार्यशाळा, परिसंवाद व संयुक्त बैठकाआयोजित करणे.

७) विद्यार्थ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी संयुक्तिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

८) महाविद्यालयातील प्रशासकीय कामकाज माहितीचे आदान - प्रदान करणे.

९) उभय महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील पुस्तकांची देवघेव करणे.

१०)विविध उपक्रमांना प्राध्यापक,कर्मचारी व विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्यासाठी प्रवृत्त करणे.

**एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित कार्यपद्धती (Modus Operandi)**

४) परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षनामध्ये सहकार्य करणे

५) विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्पर सहकार्य करणे.

६) उपलब्ध साधनसामग्रीनुसार उभय संस्थाद्वारेएक निश्चित योजना तयार करून अंमलबजावणी करणे .

**अटी:**

१)प्रत्येक उपक्रमासाठी दोन्ही संस्था स्वत:चा खर्च स्वत: उचलतील.

२)या सांमजस्य करारातील उद्दिष्ट्ये व कार्यपद्धती बाबतच्या कलमांचे उल्लघन होत असल्याचे आढळल्यास हा करार दोहोंपैकी कोणत्याही संस्थेद्वारे कधीही संपुष्टात आणला जावू शकतो.

५) उपक्रमांसाठी उपस्थित राहणाऱ्यासाधन व्यक्तीना किमान प्रवासखर्च द्यावा लागेल.

६) सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधीदहा वर्षे राहील. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता उभय संस्थावर बांधकारक राहील.

**समन्वय :**

४) सदर कराराच्या पुर्ततेची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणीसाठीदोन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य , प्राध्यापक व प्रशासकीय विभाग प्रमुख यांची असेल.

५) सदरसामंजस्य करार उपरोक्त उद्दिष्ट्ये, कार्यपद्धती व अटींच्या अधीन राहून अंमलातयेत आहेत. त्याचे अभिलेख दोन्ही संस्थांकडे सही शिक्क्यानिशी जतन राहतील.

६) खालीलस्वाक्षऱ्याचा सदरहू परस्पर सामंजस्य करार हा समन्वयिक अधिकाऱ्यांत होत आहेत. तो दिनांक ८ जानेवारी २०२४पासून पुढील दहा वर्षासाठी अमलात येत आहे.

प्र.प्राचार्य
प्रा.सौ.एम.एस.सूर्यवंशी
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
प्र.प्राचार्य
कुंभारी(ता.जत),जि.सांगली.

डॉ. सुरेश पाटील

प्र.प्राचार्य

प्राचार्य
राजे रामराव महाविद्यालय
जत. जि. सांगली.